# मिरा भाईंदर महानगरपालिका
## घनकचरा व्यवस्थापन विभाग
## प्रशासकीय गोषवारा दि.30/06/2025

**प्रकरण क्र. :-933 मुलभुत सोई सोविधांचा विकासासाठी विशेष तरतुद या योजनेतंर्गत मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत विविध क्षमतेचे डस्टबिन पुरवठा करणे कामाची निविदा स्विकृतीबाबत (निविदा अंदाजीत रक्कम रु. 19.00 कोटी) (Tender Id No. MBMC_2025_MBMC_1142810_1)**
(6-435266)

"मुलभुत सोई सोविधांचा विकासासाठी विशेष तरतुद" या योजनेतंर्गत मिरा भाईंदर महानगरपालिकेत मुलभुत सोई सोविधांचा विकास योजनेतंर्गत मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत विविध क्षमतेचे डस्टबिन पुरवठा करणे कामाची एजन्सी नियुक्त करणे कामाची दि.03/12/2024 रोजीची जाहिर निविदा सुचना प्रसिध्द करून मुदतीत दि. 26/12/2024 रोजी पर्यंत एकुण 02 निविदा प्राप्त झाल्या होत्या. सदर निविदेत सादर केलेले दर अवाजवी असल्याने फेर निविदा मागविणेस निविदा समिती शिफारस केली असून दि. 25/01/2025 रोजी मा. आयुक्त यांनी मंजुरी दिली होती. त्यानुसार दि.27/01/2025 रोजीची जाहिर निविदा सुचना दि.28/01/2025 रोजीच्या दै. सागर, दै. नवभारत या वृत्तपत्रात व ई-टेंडरींग Tender ID 2025_MBMC_1142810_1 द्वारे प्रसिध्द करण्यात आली. सदर निविदेबाबत Queries संदर्भात दि. 06/02/2025 रोजी Pre-bid meeting ठेवण्यात आली होती. सदर Pre-bid meeting मध्ये निविदेबाबत प्राप्त Queries चा खुलासा दि.12/02/2025 रोजी प्रसिध्द करण्यात आला. मुदतीत दि. 20/02/2025 रोजी पर्यंत एकुण 03 निविदा प्राप्त झाल्या आहेत.

वरीलप्रमाणे निविदाकारांनी निविदा अटीशर्तीनुसार महानगरपालिकेने मागणी केल्यानुसार तांत्रिक लिफाफामध्ये निविदाकारांनी सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी केली असता, कोनार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि., अशोक इंटरप्रायजेस व मरीन इंजिनिअरींग अॅन्ड इक्युपमेंट कं. यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी केली असता, कोनार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि. व अशोक इंटरप्रायजेस यांनी तांत्रिक कागदपत्रांची पुर्तता केली आहे त्यामुळे त्यांची निविदा पात्र ठरत आहे. तसेच मरीन इंजिनिअरींग अॅन्ड इक्युपमेंट कं. यांनी निविदेत सादर केलेल्या पत्रामधील Details of Annex M-1 मध्ये नमुद केल्याप्रमाणे सशर्त निविदा (Conditional Tender) सादर केली आहे. निविदेतील Section VI मधील Disqualification च्या अटीचे पालन न केल्याने त्यांची निविदा अपात्र ठरली आहे.

महाराष्ट्र शासन उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. भांगखस-2014/प्र.क्र.82/भाग-III/उद्योग-4, दि. 01 डिसेंबर, 2016 नुसार शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारित नियमपुस्तिकेमधील 4.4.3.1 मधील (ब) नुसार दोन निविदा तांत्रिक दृष्ट्या पात्र ठरल्यास खरेदीची वास्तविक किंमत व अगोदर ठरलेली अंदाजीत किंमत यामध्ये (-) 20 टक्के ते (+) 10 टक्के तफावत असल्यास ती मान्य करण्यास खरेदीदार विभागास मुभा राहील. असे नमुद आहे. त्यामुळे सदर निविदेचे दराचे लिफाफे उघडल्यानंतर निर्णय घेणे उचित वाटते. याकरीता पात्र निविदाकार कोनार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि. व अशोक इंटरप्रायजेस यांचा दराचा लिफाफा (Financial Bid) उघडणेस मा. निविदा समितीकडे शिफारस केली असता, पात्र निविदाकार कोनार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि. व अशोक इंटरप्रायजेस यांचा दराचा लिफाफा (Financial Bid) उघडणेस दि. 28/02/2025 रोजी मा. निविदा समितीने शिफारस केली असुन मा. आयुक्त यांनी दि.04/03/2025 रोजी मंजुरी दिलेली आहे.

त्यानुसार पात्र निविदाधारक कोनार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि. व अशोक इंटरप्रायजेस यांचे दराचे लिफाफे (Financial Bid) दि.06/03/2025 रोजी दुपारी 4.00 वा. उघडण्यात आले आहे. सदरचे दर खालीलप्रमाणे आहेत.

| Sr. No. | Description | अंदाजित रक्कम (T.S.) | एकुण नग | कोनार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांनी निविदेत सादर केलेले दर | अशोक इंटरप्रायजेस यांनी निविदेत सादर केलेले दर |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Supply and installation of Stainless Steel/Powder Coated / Aluminum Bins within limits of Mira Bhayandar Municipal Corporation - 2 Bin Stainless Steel | रु. 3,34,26,000 | 500 | **रु. 66,183/- प्रती नग एकुण दर रु.3,30,91,500/-** | रु. 70,194/- प्रती नग एकुण दर रु. 3,50,97,000/- |
| 2 | Supply and installation of Stainless Steel/Powder Coated / Aluminum Bins within limits of Mira Bhayandar Municipal Corporation - 3 Bin Stainless Steel | रु. 3,51,96,000 | 500 | **रु. 69,688/- प्रती नग एकुण दर रु.3,48,44,000/-** | रु. 73,911/- प्रती नग एकुण दर रु. 3,69,55,500/- |
| 3 | Supply and installation of Automatic dustbin fitted with solar panel within limits of Mira Bhayandar Municipal Corporation | रु. 1,98,24,000 | 21 | **रु. 9,34,560/- प्रती नग एकुण दर रु.1,96,25,760/-** | रु. 9,91,200/- प्रती नग एकुण दर रु. 2,08,15,200/- |
| 4 | Supply and installation of Bins (having capacity of 120 liters and 240 liters) **Total Height 1005 mm Bin Upper Diameter 610 mm Bin Lower diameter 450 mm Thickness 3.6 Fiber Body Bins Total Bin Capacity 190 Ltr Material Fibre glass double matt Branding -1 embossing branding -2 vinyl Stickers or Equivalent** | रु. 9,99,78,480 | 2868 | **रु. 34,511/- प्रती नग एकुण दर रु.9,89,77,548/-** | रु. 36,603/- प्रती नग एकुण दर रु. 10,49,77,404/- |
| | **एकुण रक्कम** | रु.18,84,24,480/- | | रु.18,65,38,808/- | रु.19,78,45,104/- |

वरीलप्रमाणे निविदाकारांनी निविदेत सादर केलेले दर अंतिम करणेकामी मा. निविदा समितीकडे निर्णयास्तव सादर केले असता, कोनार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांनी निविदेत सादर केलेले दराने निविदा स्विकारणेस मा. निविदा समिती दि.11/03/2025 रोजी शिफारस केली होती. त्यानुसार कोनार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांनी निविदेत सादर केलेल्या दराने निविदा स्विकारणेस, करारनामा करुन कार्यादेश देणेस, उक्त प्रस्तावास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी करीता मा. आयुक्त यांना सादर करण्यात आले होते. उक्त निविदेबाबत लोकप्रतिनिधी यांच्यामार्फत तक्रारी प्राप्त झाले असुन तक्रारीच्या अनुषगांने मा. आयुक्त यांनी दि.09/06/2025 (E- 435266) विधी अधिकारी, विधी विभाग यांचे अभिप्राय घेऊन तसेच मा. निविदा समितीकडे पुनश्चः बैठक आयोजीत करून निर्णय घेणेस निर्देश दिलेले होते. त्यानुसार सदर कामाबाबत विधी अधिकारी यांच्यामार्फत दि. 17/06/2025 रोजी अभिप्राय देण्यात आला असुन, "वरील सर्व बाबींचा सखोल विचार करता असे दिसून येते की निविदेमध्ये उल्लेखित वर्णनातील अल्पसा फरक / भेद हा इतर निविदाकाराच्या हक्कावर कुठलाही अन्याय करत नाही व निविदा प्रक्रियेतील पारदर्शकतेवरही परिणाम करत नाही. त्यामुळे, निविदा समितीने या बाबीचा सार्वजनिक हित लक्षात घेऊन व न्यायालयीन निर्देशांनुसार योग्य तो निर्णय घ्यावा, अशी शिफारस करण्यात येते" वरीलप्रमाणे निविदेतील कमी दराचे निविदाकार कोनार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांनी निविदेत सादर केलेल्या दराने निविदा स्विकारणेस दि. 19/06/2025 रोजी निविदा समितीने शिफारस केली आहे. त्यानुसार "मुलभुत सोई सोविधांचा विकासासाठी विशेष तरतुद" या योजनेतंर्गत मिरा भाईंदर महानगरपालिकेत मुलभुत सोई सोविधांचा विकास योजनेतंर्गत मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत विविध क्षमतेचे डस्टबिन पुरवठा करणे कामी कोनार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांनी निविदेत सादर केलेल्या दराने निविदा स्विकारणेस, करारनामा करुन कार्यादेश देणेस, उक्त प्रस्तावास निविदा अंदाजीत रक्कम रु.19.00 कोटी आर्थिक व प्रशासकीय मंजुरीस्तव व गोषवारा सादर करणेस मा. आयुक्त यांनी दि. 22/06/2025 रोजी मंजुरी दिलेली आहे.

तरी, मुलभुत सोई सोविधांचा विकासासाठी विशेष तरतुद या योजनेतंर्गत मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत विविध क्षमतेचे डस्टबिन पुरवठा करणे कामी कोनार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांनी निविदेत सादर केलेल्या दराने निविदा स्विकारणेस, करारनामा करुन कार्यादेश देणेस, उक्त प्रस्तावास निविदा अंदाजीत रक्कम रु. 19.00 कोटी इतक्या खर्चास मंजुरी मिळणेस शिफारस असे.

24/06/25

**(डॉ. सचिन बांगर)**
**उपायुक्त (घ.व्य.)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**
24/6

**(मा. आयुक्त यांच्या मान्यतेने)**

Z:\Nirbhay Patil\Public Health\Raj Documents\STANDING GOSHVARA\Dustbin.docx

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## घनकचरा व्यवस्थापन विभाग
## प्रशासकीय ठराव दि.30/06/2025

प्रकरण क्र. :- 933 मुलभुत सोई सोविधांचा विकासासाठी विशेष तरतुद या योजनेतंर्गत मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत विविध क्षमतेचे डस्टबिन पुरवठा करणे कामाची निविदा स्विकृतीबाबत (निविदा अंदाजीत रक्कम रु.19.00 कोटी) (Tender Id No. MBMC_2025_MBMC_1142810_1)

ठराव क्र. :- 933

"मुलभुत सोई सोविधांचा विकासासाठी विशेष तरतुद" या योजनेतंर्गत मिरा भाईंदर महानगरपालिकेत मुलभुत सोई सोविधांचा विकास योजनेतंर्गत मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत विविध क्षमतेचे डस्टबिन पुरवठा करणे कामाची एजन्सी नियुक्त करणे कामाची दि. 03/12/2024 रोजीची जाहिर निविदा सुचना प्रसिध्द करून मुदतीत दि. 26/12/2024 रोजी पर्यंत एकुण 02 निविदा प्राप्त झाल्या होत्या. सदर निविदेत सादर केलेले दर अवाजवी असल्याने फेर निविदा मागविणेस निविदा समिती शिफारस केली असून दि. 25/01/2025 रोजी मा. आयुक्त यांनी मंजुरी दिली होती. त्यानुसार दि.27/01/2025 रोजीची जाहिर निविदा सुचना दि.28/01/2025 रोजीच्या दै. सागर, दै. नवभारत या वृत्तपत्रात व ई-टेंडरींग Tender ID 2025_MBMC_1142810_1 द्वारे प्रसिध्द करण्यात आली. सदर निविदेबाबत Queries संदर्भात दि. 06/02/2025 रोजी Pre-bid meeting ठेवण्यात आली होती. सदर Pre-bid meeting मध्ये निविदेबाबत प्राप्त Queries चा खुलासा दि. 12/02/2025 रोजी प्रसिध्द करण्यात आला. मुदतीत दि. 20/02/2025 रोजी पर्यंत एकुण 03 निविदा प्राप्त झाल्या आहेत.

वरीलप्रमाणे निविदाकारांनी निविदा अटीशर्तीनुसार महानगरपालिकेने मागणी केल्यानुसार तांत्रिक लिफाफामध्ये निविदाकारांनी सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी केली असता, कोनार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि., अशोक इंटरप्रायजेस व मरीन इंजिनिअरींग ॲन्ड इक्युपमेंट कं. यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी केली असता, कोनार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि. व अशोक इंटरप्रायजेस यांनी तांत्रिक कागदपत्रांची पुर्तता केली आहे त्यामुळे त्यांची निविदा पात्र ठरत आहे. तसेच मरीन इंजिनिअरींग ॲन्ड इक्युपमेंट कं. यांनी निविदेत सादर केलेल्या पत्रामधील Details of Annex M-1 मध्ये नमुद केल्याप्रमाणे सशर्त निविदा (Conditional Tender) सादर केली आहे. निविदेतील Section VI मधील Disqualification च्या अटीचे पालन न केल्याने त्यांची निविदा अपात्र ठरली आहे.

महाराष्ट्र शासन उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. भांगखस-2014/प्र.क्र.82/भाग-III/उद्योग-4, दि. 01 डिसेंबर, 2016 नुसार शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारित नियमपुस्तिकेमधील 4.4.3.1 मधील (ब) नुसार दोन निविदा तांत्रिक दृष्ट्या पात्र ठरल्यास खरेदीची वास्तविक किंमत व अगोदर ठरलेली अंदाजीत किंमत यामध्ये (-) 20 टक्के ते (+) 10 टक्के तफावत असल्यास ती मान्य करण्यास खरेदीदार विभागास मुभा राहील. असे नमुद आहे. त्यामुळे सदर निविदेचे दराचे लिफाफे उघडल्यानंतर निर्णय घेणे उचित वाटते. याकरीता पात्र निविदाकार कोनार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि. व अशोक इंटरप्रायजेस यांचा दराचा लिफाफा (Financial Bid) उघडणेस मा. निविदा समितीकडे शिफारस केली असता, पात्र निविदाकार कोनार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि. व अशोक इंटरप्रायजेस यांचा दराचा लिफाफा (Financial

Bid) उघडणेस दि. 28/02/2025 रोजी मा. निविदा समितीने शिफारस केली असुन मा. आयुक्त यांनी दि.04/03/2025 रोजी मंजुरी दिलेली आहे.

त्यानुसार पात्र निविदाधारक कोनार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि. व अशोक इंटरप्रायजेस यांचे दराचे लिफाफे (Financial Bid) दि.06/03/2025 रोजी दुपारी 4.00 वा. उघडण्यात आले आहे. सदरचे दर खालीलप्रमाणे आहेत.

| Sr. No. | Description | अंदाजित रक्कम (T.S.) | एकुण नग | कोनार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांनी निविदेत सादर केलेले दर | अशोक इंटरप्रायजेस यांनी निविदेत सादर केलेले दर |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Supply and installation of Stainless Steel/Powder Coated / Aluminum Bins within limits of Mira Bhayandar Municipal Corporation - 2 Bin Stainless Steel | रु. 3,34,26,000 | 500 | **रु. 66,183/- प्रती नग एकुण दर रु. 3,30,91,500/-** | रु. 70,194/- प्रती नग एकुण दर रु. 3,50,97,000/- |
| 2 | Supply and installation of Stainless Steel/Powder Coated / Aluminum Bins within limits of Mira Bhayandar Municipal Corporation - 3 Bin Stainless Steel | रु. 3,51,96,000 | 500 | **रु. 69,688/- प्रती नग एकुण दर रु. 3,48,44,000/-** | रु. 73,911/- प्रती नग एकुण दर रु. 3,69,55,500/- |
| 3 | Supply and installation of Automatic dustbin fitted with solar panel within limits of Mira Bhayandar Municipal Corporation | रु. 1,98,24,000 | 21 | **रु. 9,34,560/- प्रती नग एकुण दर रु. 1,96,25,760/-** | रु. 9,91,200/- प्रती नग एकुण दर रु. 2,08,15,200/- |
| 4 | Supply and installation of Bins (having capacity of 120 liters and 240 liters) **Total Height 1005 mm Bin Upper Diameter 610 mm Bin Lower diameter 450 mm Thickness 3.6 Fiber Body Bins Total Bin Capacity 190 Ltr Material Fibre glass double matt Branding -1 embossing branding -2 vinyl Stickers or Equivalent** | रु. 9,99,78,480 | 2868 | **रु. 34,511/- प्रती नग एकुण दर रु. 9,89,77,548/-** | रु. 36,603/- प्रती नग एकुण दर रु. 10,49,77,404/- |
| | **एकुण रक्कम** | **रु.18,84,24,480/-** | | **रु.18,65,38,808/-** | **रु.19,78,45,104/-** |

वरीलप्रमाणे निविदाकारांनी निविदेत सादर केलेले दर अंतिम करणेकामी मा. निविदा समितीकडे निर्णयास्तव सादर केले असता, कोनार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांनी निविदेत सादर केलेले दराने निविदा स्विकारणेस मा. निविदा समिती दि.11/03/2025 रोजी शिफारस केली होती. त्यानुसार कोनार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांनी निविदेत सादर केलेल्या दराने निविदा स्विकारणेस, करारनामा करुन कार्यादेश देणेस, उक्त प्रस्तावास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी करीता मा. आयुक्त यांना सादर करण्यात आले होते. उक्त निविदेबाबत लोकप्रतिनिधी यांच्यामार्फत तक्रारी प्राप्त झाले असुन तक्रारीच्या अनुषगांने मा. आयुक्त यांनी दि.09/06/2025 (E- 435266) विधी अधिकारी, विधी विभाग यांचे अभिप्राय घेऊन तसेच मा. निविदा समितीकडे पुनश्चः बैठक आयोजीत करून निर्णय घेणेस निर्देश दिलेले होते. त्यानुसार सदर कामाबाबत विधी अधिकारी यांच्यामार्फत दि. 17/06/2025 रोजी अभिप्राय देण्यात आला असुन, "वरील सर्व बाबींचा सखोल विचार करता असे दिसून येते की निविदेमध्ये उल्लेखित वर्णनातील अल्पसा फरक / भेद हा इतर निविदाकाराच्या हक्कावर कुठलाही अन्याय करत नाही व निविदा प्रक्रियेतील पारदर्शकतेवरही परिणाम करत नाही. त्यामुळे, निविदा समितीने या बाबीचा सार्वजनिक हित लक्षात घेऊन व न्यायालयीन निर्देशांनुसार योग्य तो निर्णय घ्यावा, अशी शिफारस करण्यात येते". वरीलप्रमाणे निविदेतील कमी दराचे निविदाकार कोनार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांनी निविदेत सादर केलेल्या दराने निविदा स्विकारणेस दि. 19/06/2025 रोजी निविदा समितीने शिफारस केली आहे.

नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-2020प्र.क्र.71 (भाग-2)/ नवि-14, दि. 26 ऑगस्ट 2022 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुद व विशेषतः कलम 452 अ च्या (1 अ) व (1 ब) मधील तरतुदीनुसार मा. आयुक्त यांनी प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आली असुन त्यांना अधिनियमातील सर्व अधिकार प्राप्त झाले आहेत.

तरी, "मुलभुत सोई सोविधांचा विकासासाठी विशेष तरतुद" या योजनेतंर्गत मिरा भाईंदर महानगरपालिकेत मुलभुत सोई सोविधांचा विकास योजनेतंर्गत मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत विविध क्षमतेचे डस्टबिन पुरवठा करणे कामी कोनार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांनी निविदेत सादर केलेल्या दराने निविदा स्विकारणेस, करारनामा करुन कार्यादेश देणेस, उक्त प्रस्तावास निविदा अंदाजीत वार्षिक रक्कम रु. 19.00 कोटी इतक्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

पारित ठरावानुसार घनकचरा व्यवस्थापन विभागाने नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(राधाबिनोद अरिबम शर्मा, भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

Z:\Nirbhay Patil\Public Health\Raj Documents\STANDING GOSHVARA\Dustbin.docx

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

**बांधकाम / विद्युत विभाग**

दि. 30/ 06 /2025

// गोषवारा //

**प्रकरण क्र. ( १३४ ) :- घोडबंदर येथील पदमाली उद्यान दैनदिन संचालन, देखभाल व दुरुस्तीसाठी श्री ग्रामदेवी ट्रस्ट, घोडबंदर या संस्थेकडे हस्तातंर करणे. (E-1789078)**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मौजे घोडबंदर येथे महानगरपालिकेने पदमाली तलाव व सभोवताली असलेल्या परिसर विकसीत केला आहे. सदर तलावाच्या परिसरातील जुन्या असलेल्या मंदिरासाठी बांधकाम देखिल केलेले आहे.

सदर तलाव व उद्यान महानगरपालिकेने नागरीकांसाठी खुले केलेले नाही. सदर ठिकाणी तीन पाळीत सुरक्षा रक्षक, उद्यान विभागातील माळी, सफाई कामगार इ. नेमावे लागणार आहेत. महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती पहाता महानगरपालिकेच्या मालमत्ता उदा. उद्याने, दुभाजक इ.खाजगी संस्थना देखभाल व दुरुस्तीसाठी देण्याचे महानगरपालिकेने धोरण ठरविलेले आहे. (मा. महासभा दि.28/06/2016 ठराव क्र.12)

घोडबंदर येथील ग्रामस्थ उत्सव मंडळ यांनी सदर पद्माली तलाव व उद्यानाची जागा त्यांच्याकडे हस्तांतर करण्याची मागणी केली होती. याबाबत दि.24/04/2025 रोजी मा. आयुक्त दालनात घोडबंदर ग्रामस्थ उत्सव मंडळ यांनी भेट घेऊन चर्चा केली होती.

महानगरपालिकेच्या धोरणानुसार सदर तलाव व उद्यानाची जागा संस्थेस दैनंदिन संचालन, देखभाल व दुरुस्तीसाठी दिल्यास सदर उद्यान सुरु करुन सुस्थितीत ठेवणे. सुरक्षा व्यवस्था करणे यावर होणारा खर्च वाचून संस्थेमार्फत सदर तलाव व उद्यानाची नीट देखभाल व दुरुस्ती होऊन रहिवाशांना देखिल सदर जागेत फिरावयास मिळेल.

सदर जागेवरील यापुर्वीचे लहान मंदिर असून त्या ठिकाणी संगणादेवी मंदिरातील काढलेले मुर्त्या ठेऊन पुजा अर्चा करण्यास देखिल महानगरपालिकेची हरकत नाही. सदर उद्यान हे सर्व सामान्य नागरीकांना वापरण्यास देखील खुले राहिल.

सदर उद्यान व परिसरातील स्वखर्चाने दैनदिन साफ सफाई देखभाल व दुरुस्ती करणे, सर्व सामान्ये नागरीकांना उद्यान व जागेत विनामुल्य प्रवेश देणे या अटीवर सदर जागा दैनंदिन संचलन, देखभाल व दुरुस्तीसाठी ग्रामस्थ उत्सव मंडळ, घोडबंदर या नोंदणीकृत संस्थेस देण्यासाठी मा. प्रशासकिय ठराव क्र.110 दि.09/06/2025 अन्वये निर्णय घेण्यात आला होता. तथापि, सदर संस्थेने सदर कामाकरीता श्री ग्रामदेवी ट्रस्ट, घोडबंदर यांच्यासोबत करारनामा करण्यासाठी पत्रान्वये कळविलेले आहे. श्री. ग्रामदेवी ट्रस्ट, घोडबंदर यांनी देखिल मागणी केली आहे. तरी श्री ग्रामदेवी ट्रस्ट, घोडबंदर या संस्थेस जागा हस्तांतरीत करणेसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 63(20) व 66(10) अन्वये मान्यता देण्यास शिफारस आहे.

**(दिपक खांबित)**
**शहर अभियंता**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

मा. आयुक्त यांच्या मान्यतेने

PC-14/25-26/DK/GO-6

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव दिनांक ३०|०६| २०२५

**प्रकरण क्र. ( १३४ ) :- घोडबंदर येथील पदमाली उदयान दैनदिन संचालन, देखभाल व दुरुस्तीसाठी ग्रामस्थ उत्सव मंडळ, घोडबंदर या संस्थेकडे हस्तातंर करणे.**

**ठराव क्र. ( १३४ )**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मौजे घोडबंदर येथे महानगरपालिकेने पदमाली तलाव व सभोवताली असलेल्या परिसर विकसीत केला आहे. सदर तलावाच्या परिसरातील जुन्या असलेल्या मंदिरासाठी बांधकाम देखिल केलेले आहे.

सदर तलाव व उद्यान महानगरपालिकेने नागरीकांसाठी खुले केलेले नाही. सदर ठिकाणी तीन पाळीत सुरक्षा रक्षक, उद्यान विभागातील माळी, सफाई कामगार इ. नेमावे लागणार आहेत. महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती पहाता महानगरपालिकेच्या मालमत्ता उदा. उद्याने, दुभाजक इ.खाजगी संस्थना देखभाल व दुरुस्तीसाठी देण्याचे महानगरपालिकेने धोरण ठरविलेले आहे. (मा. महासभा दि.28/06/2016 ठराव क्र.12)

घोडबंदर येथील ग्रामस्थ उत्सव मंडळ यांनी सदर पद्माली तलाव व उद्यानाची जागा त्यांच्याकडे हस्तांतर करण्याची मागणी केली होती. याबाबत दि.24/04/2025 रोजी मा. आयुक्त दालनात घोडबंदर ग्रामस्थ उत्सव मंडळ यांनी भेट घेऊन चर्चा केली होती.

महानगरपालिकेच्या धोरणानुसार सदर तलाव व उद्यानाची जागा संस्थेस दैनंदिन संचालन, देखभाल व दुरुस्तीसाठी दिल्यास सदर उद्यान सुरु करुन सुस्थितीत ठेवणे. सुरक्षा व्यवस्था करणे यावर होणारा खर्च वाचून संस्थेमार्फत सदर तलाव व उद्यानाची नीट देखभाल व दुरुस्ती होऊन रहिवाशांना देखिल सदर जागेत फिरावयास मिळेल.

सदर जागेवरील यापुर्वीचे लहान मंदिर असून त्या ठिकाणी संगणादेवी मंदिरातील काढलेले मुर्त्या ठेऊन पुजा अर्चा करण्यास देखिल महानगरपालिकेची हरकत नाही. सदर उद्यान हे सर्व सामान्य नागरीकांना वापरण्यास देखील खुले राहिल.

सदर उद्यान व परिसरातील स्वखर्चाने दैनदिन साफ सफाई देखभाल व दुरुस्ती करणे, सर्व सामान्ये नागरीकांना उद्यान व जागेत विनामुल्य प्रवेश देणे या अटीवर सदर जागा दैनंदिन संचलन, देखभाल व दुरुस्तीसाठी ग्रामस्थ उत्सव मंडळ, घोडबंदर या नोंदणीकृत संस्थेस देण्यासाठी मा. प्रशासकिय ठराव क्र.110 दि.09/06/2025 अन्वये निर्णय घेण्यात आला होता. तथापि, सदर संस्थेने सदर कामाकरीता श्री ग्रामदेवी ट्रस्ट, घोडबंदर यांच्यासोबत करारनामा करण्यासाठी पत्रान्वये कळविलेले आहे. श्री. ग्रामदेवी ट्रस्ट, घोडबंदर यांनी देखिल मागणी केली आहे. तरी श्री ग्रामदेवी ट्रस्ट, घोडबंदर या संस्थेस जागा हस्तांतरीत करणेसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 63(20) व 66(10) अन्वये मान्यता देण्यात येत आहे. पारित ठरावानुसार संबंधित विभागाने नियमानुसार कार्यवाही प्रस्तावित करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(राधाबिनोद अ. शर्मा, भाप्रसे)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत बांधकाम विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना

PC-14/25-26/DKPT-6

आस्थापना विभाग

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## दि. 30/ 06 /2025

## (गोषवारा)

प्रकरण :- 934 मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील उप-मुख्य अग्निशमन अधिकारी, अग्निशमन केंद्र अधिकारी, उप-मुख्य लेखा व वित्त अधिकारी व शाखा अभियंता (विद्युत) या पदावर दिलेल्या पदोन्नतीस मान्यता मिळणेबाबत.

नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक: मिभाम- 1116/प्र.क्र.36 (भाग-1)/16/नवि-28, दि. 26 फेब्रुवारी, 2019 नुसार मिरा भाईदर महानगरपालिकेतील विभागांकरीता विविध संवर्गातील पदे निर्माण करण्यास व महानगरपालिकेच्या आकृतीबंधास मान्यता प्राप्त झाली आहे. तसेच नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक:-मिभाम-1116/प्र.क्र.35/16/नवि-28, दि. 28 मे, 2019 अन्वये मिरा भाईदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम 2019, नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक मिभाम-1116/प्र.क्र.35/नवि-28, दि. 25 नोव्हेंबर, 2021 व शासन निर्णय क्रमांक मिभाम-1123/प्र.क्र.22/नवि-28, दि.07/06/2023 अन्वये मिरा भाईदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम 2019 च्या सुधारणेस मान्यता दिल्यानुसार उप-मुख्य अग्निशमन अधिकारी, अग्निशमन केंद्र अधिकारी, उप-मुख्य लेखा व वित्त अधिकारी व शाखा अभियंता (विद्युत) या पदावर पदोन्नतीकरीता खालीलप्रमाणे अर्हता विहित करण्यात आली आहे.

| पदनाम व श्रेणी | नेमणुकीची पध्दत व टक्केवारी | नेमणुकीकरता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती |
|---|---|---|
| उप मुख्य अग्निशमन अधिकारी | पदोन्नती 100% | मिरा भाईदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील 'अग्निशमन केंद्र अधिकारी' या पदावर किमान 03 वर्षे सेवा पूर्ण झालेल्या किंवा 'सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी' या पदावर किमान 10 वर्षे सेवा पूर्ण झालेल्या (यापूर्वी लगतच्या 2 वर्षात 'अग्निशमन केंद्र अधिकारी' या पदावर पदोन्नती दिली असल्यास मागील सेवा विचारात घेऊन) व राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर यांच्याकडील पदवी (B.E. Fire).<br>किंवा<br>राष्ट्रीय अग्निशमनसेवा महाविद्यालय, नागपूर यांच्याकडील Divisional Fire Officer पाठयक्रम (अग्निशमन अभियांत्रिकी मधील प्रगत पदविका)<br>किंवा<br>The Istitution of Fire Engineers (U.K) किंवा (India) या संस्थेकडील सदस्यत्व (M.I.Fire)<br>किंवा<br>कोणत्याही शाखेची पदवी प्राप्त केल्यानंतर The Istitution of Fire Engineers (U.K) यांचे सदस्यत्व प्राप्त केलेल्या अधिकाऱ्याची सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| अग्निशमन केंद्र अधिकारी | पदोन्नती 100% | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची कोणत्याही शाखेची पदवी.<br>ब) राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय नागपूर, यांच्याकडील Station Officer & Instructor पाठयक्रम |

| | | |
|---|---|---|
| | | उत्तीर्ण,<br>किंवा<br>क) The Institution of Fire Engineering (U.K) किंवा (India) या संस्थेकडून Grade - I ही पदवी प्राप्त अधिकारी/कर्मचाऱ्याची सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल.<br>किंवा<br>ड) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील 'सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी' या पदावर किमान 3 वर्ष सेवा पूर्ण झालेल्या अधिकाऱ्याची व मान्यताप्राप्त विद्यापिठाची कोणत्याही शाखेची पदवी धारण करणाऱ्या सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल.<br>किंवा<br>इ) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील 'अग्निशमन प्रणेता (लिडींग फायरमन) /चालक-यंत्रचालक या पदावर किमान 10 वर्षे सेवा पूर्ण झालेल्या व मान्यताप्राप्त विद्यापिठाची कोणत्याही शाखेची पदवी धारण करणाऱ्या (यापूर्वी लगतच्या 2 वर्षात 'सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी' या पदावर पदोन्नती दिली असल्यास मागील सेवा विचारात घेऊन), तसेच, उपरोक्त 'ब' किंवा 'क' येथील अर्हता धारण करणाऱ्या कर्मचा-याची सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी | पदोन्नती 100% | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या लेखा अधिकारी (गट-ब) या पदावर किमान 03 वर्षाची सेवा पूर्ण झालेल्या अधिकाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| शाखा अभियंता (विद्युत) | पदोन्नती 100% | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कनिष्ठ अभियंता (विद्युत) या पदावर किमान 3 वर्षाची सेवा पूर्ण झालेल्या व कनिष्ठ अभियंता व्यवसायिक परिक्षा उत्तीर्ण असलेल्या कर्मचाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |

मिरा भाईंदर महानगरपालिका आकृतीबंधानुसार उप मुख्य अग्निशमन अधिकारी या संवर्गात 01 पद, अग्निशमन केंद्र अधिकारी या संवर्गात 08 पदे, उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी 01 पद व शाखा अभियंता (विद्युत) 01 पद मंजूर आहे, मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारित सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम-2019 नुसार उप मुख्य अग्निशमन अधिकारी या संवर्गाचे 01 पद, अग्निशमन केंद्र अधिकारी या संवर्गात 05 पदे, उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी 01 पद व शाखा अभियंता (विद्युत) 01 पद 100% पदोन्नतीने भरावयाचे आहे.

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक: एसआरव्ही-2018/प्र.क्र. 159/कार्यासन-12, दि.01 ऑगस्ट, 2019 नुसार शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नती देण्याकरीता अनुसरावयाच्या कार्यवाहीबाबतची एकत्रित मार्गदर्शक तत्वे विहित करण्यात आलेली आहेत. सदर शासन निर्णयातील मुद्दा क्र.३ (3) नुसार विचारक्षेत्रातील सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांची अ.क्र. i) ते Xiii) मधील निकषांच्या आधारे पात्रता तपासणेबाबत नमुद आहे.

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक: बीसीसी 2018/प्र.क्र.366/16-ब, दि.07 में, 2021 नुसार मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र.2797/2015 या

प्रकरणी दि. 04/08/2017 रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने व मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या या निर्णयास अद्याप स्थगिती दिलेली नसल्याने पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दि.25/05/2004 च्या स्थितीनुसार सेवाजेष्ठतेने भरण्यात यावी असे निर्देश आहेत. तसेच सदर पदोन्नत्या निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात मा. सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्र.28306/2017 वरील अंतिम निर्णयाच्या अधिन असतील अशी कार्यवाही करताना पदोन्नतीमधील आरक्षणाचा लाभ घेऊन सध्याच्या सेवाजेष्ठता यादीत वरच्या स्थानावर आलेल्या कोणत्याही मागासवर्गीय अधिकारी/कर्मचाऱ्यांना पदावनत करण्यात येऊ नये असे निर्देश आहेत.

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र. दिव्यांग 2015/प्र.क्र.171/16-अ. दि.23 जुलै, 2021 नुसार सर्व आस्थापनांनी गट-अ व गट-ब संवर्गातील पदोन्नतीबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दि.22/07/2021 रोजीच्या निर्णयानुसार दिव्यांग आरक्षणासह पदोन्नतीसाठीची सर्व रिक्त पदे (100%) भरण्याबाबत त्वरीत कार्यवाही करण्यात यावी. तसेच अशी कार्यवाही करताना मा.उच्च न्यायालयाच्या दि.22/07/2021 रोजीच्या आदेशाचा अवमान होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी, असे निर्देश आहेत.

उप-मुख्य अग्निशमन अधिकारी, अग्निशमन केंद्र अधिकारी, उप-मुख्य लेखा व वित्त अधिकारी व शाखा अभियंता (विद्युत) या पदोन्नतीने भरावयाच्या रिक्त पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देणेकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 54 (1) अन्वये गठीत केलेल्या पदोन्नती निवड समितीची बैठक दि.02/06/2025 रोजी आयोजित करण्यात आली होती.

उप-मुख्य अग्निशमन अधिकारी, अग्निशमन केंद्र अधिकारी, उप-मुख्य लेखा व वित्त अधिकारी व शाखा अभियंता (विद्युत) या संवर्गातील रिक्त पदावर पदोन्नती देणेबाबत महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय दि.01 ऑगस्ट, 2019 मध्ये विहित कार्यपध्दतीनुसार रिक्त पदांचा व विचार क्षेत्रातील अधिकारी/कर्मचारी यांचा पदोन्नती देण्याचा प्रस्ताव पदोन्नती निवड समितीसमोर सादर करण्यात आलेला आहे. पदोन्नती निवड समितीने खालील अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नती समितीने निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात अटीशर्तीच्या अधिन राहून पदोन्नती देणेकरीता शिफारस केली आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव | सध्याचे पद | पदोन्नतीचे पद | नेमणुक प्रवर्ग | पदोन्नतीच्या पदाची वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| 1. | श्री.प्रकाश शंकर बोराडे (S-15 41800-132300) | अग्निशमन केंद्र अधिकारी | उप मुख्य अग्निशमन अधिकारी | खुला | S-16 44900-142400 |
| 2. | श्री.अल्पेश जगन्नाथ संखे S-13 35400 - 112400 | सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी | अग्निशमन केंद्र अधिकारी | खुला | S-15 41800-132300 |
| 3. | श्री.डॉसन आबेल ढोल्या S-13 35400 - 112400 | सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी | अग्निशमन केंद्र अधिकारी | खुला | S-15 41800-132300 |
| 4. | श्री.सदानंद विष्णु पाटील S-13 35400 - 112400 | सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी | अग्निशमन केंद्र अधिकारी | खुला | S-15 41800-132300 |
| 5. | श्री.प्रशांत अंकुश गुरव S-13. 35400 - 112400 | सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी | अग्निशमन केंद्र अधिकारी | खुला | S-15 41800-132300 |
| 6. | श्री.उत्तम जानू तारमळे S-15 41800-132300 | लेखाधिकारी | उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी | खुला | S-16 44900-142400 |
| 7. | श्री.प्रशांत प्रकाश जानकर S-13 35400-112400 | कनिष्ठ अभियंता (विद्युत) | शाखा अभियंता (विद्युत) | खुला | S-15 41800 - 132300 |

उप-मुख्य अग्निशमन अधिकारी, अग्निशमन केंद्र अधिकारी, उप-मुख्य लेखा व वित्त अधिकारी व शाखा अभियंता (विद्युत) गट-ब संवर्गातील पद असल्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 53 (1) अन्वये सदर पदावर नेमणूक करण्याचा अधिकार महापालिकेमध्ये निहित आहे.

सबब वरील अधिकारी यांना नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक:- मिभाम-1116/प्र.क्र.36 (भाग-1)/16/नवि-28, दि.26 फेब्रुवारी, 2019 नुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेतील विभागांकरीता विविध संवर्गातील पदे निर्माण करण्यास व महानगरपालिकेच्या आकृतीबंधास मान्यता प्राप्त झाली आहे. तसेच नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक मिभाम-1116/प्र.क्र.35/16/नवि-28, दि.28 मे, 2019 व नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील क्रमांक मिभाम-1116/प्र.क्र.35/नवि-28, दि.25 नोव्हेंबर, 2021 व शासन निर्णय क्रमांक मिभाम-1123/प्र.क्र.22/नवि-28, दि.07/06/2023 अन्वये मिरा आईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम 2019 च्या सुधारणेस मान्यता दिल्यानुसार पदोन्नती देण्यासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता व पात्रता धारण केली आहे.

त्यामुळे वरील अधिकारी यांना सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक: एसआरव्ही-2018/प्र.क्र.159/कार्यासन-12, दि.01 ऑगस्ट, 2019 नुसार शासकीय अधिकारी यांना पदोन्नती देण्याकरीता अनुसरावयाच्या कार्यवाहीबाबतची एकत्रित मार्गदर्शक तत्वाचा अवलंब करून मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र. 28306/2017 मधील निर्णयाच्या अधिन राहुन निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात आलेली आहे.

तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 53 (3) अन्वये अधिकारी/कर्मचारी मग ते कायम असोत किंवा तात्पुरते असोत यांची नेमणुक करण्याचा अधिकार आयुक्ताकडे निहित आहेत. परंतु कायम नेमणुकांच्या बाबतीत असा अधिकार कलम 51 अन्वये तयार केलेल्या व मंजुर केलेल्या, त्या वेळी अमलात असलेल्या विवरणपत्राच्या अधिन असेल.

त्याअनुषंगाने वरील अधिकारी यांना दिलेल्या पदोन्नत्या हया तात्पुरत्या स्वरुपाच्या असुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 53 (3) नुसार मा.आयुक्त यांनी मा.प्रशासकीय मान्यतेच्या अधिन राहुन पदोन्नती आदेश देण्यात आलेले आहेत.

तरी सदर प्रस्तावास मा.प्रशासकीय सभेची मान्यता मिळणे आवश्यक आहे. सदयस्थितीत मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या लोक प्रतिनिधींची मुदत संपल्याने महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ 2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14, दि.26/08/2022 नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषतः कलम 452 अ च्या (1) अ) व (1) ब) मधील तरतुदीनुसार दि.27/08/2022 रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका येथे प्रशासक या पदी आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना नियुक्त करण्यात आले आहे.

सबब मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील उप-मुख्य अग्निशमन अधिकारी, अग्निशमन केंद्र अधिकारी, उप-मुख्य लेखा व वित्त अधिकारी व शाखा अभियंता (विद्युत) (गट-ब) या पदावर दिलेल्या पदोन्नतीस मान्यता मिळणेबाबतच्या प्रस्तावास मा.प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका यांची मंजूरी मिळणेस शिफारस आहे.

(कल्पिता पिंपळे)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

(मा.आयुक्त महोदय यांचे मान्यतेने)

मा. महासभा / स्थायी समिती सभा
गोषवारा प्राप्त दि.१८/०६/२०२४ वेळ ४=४० वा.
रजिस्टर नोंद अ. क्र. 938 वर्ष 2024/25
सचिव विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

Ravi asthapana\d Ravi पदोन्नती अग्निशमन केंद्र अधिकारी प्रशासकीय गोषवारा.doc

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## आस्थापना विभाग

## दि. 30/06/2025

प्रकरण क्र. :- 934 मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील उप-मुख्य अग्निशमन अधिकारी, अग्निशमन केंद्र अधिकारी, उप-मुख्य लेखा व वित्त अधिकारी व शाखा अभियंता (विद्युत) या पदावर दिलेल्या पदोन्नतीस मान्यता मिळणेबाबत.

ठराव क्र. :- 934

नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक: मिभाम- 1116/प्र.क्र.36 (भाग-1)/16/नवि-28, दि. 26 फेब्रुवारी, 2019 नुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेतील विभागांकरीता विविध संवर्गातील पदे निर्माण करण्यास व महानगरपालिकेच्या आकृतीबंधास मान्यता प्राप्त झाली आहे. तसेच नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक:-मिभाम-1116/प्र.क्र.35/16/नवि-28, दि. 28 मे, 2019 अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम 2019, नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक मिभाम-1116/प्र.क्र.35/नवि-28, दि. 25 नोव्हेंबर, 2021 व शासन निर्णय क्रमांक मिभाम-1123/प्र.क्र.22/नवि-28, दि.07/06/2023 अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम 2019 च्या सुधारणेस मान्यता दिल्यानुसार उप-मुख्य अग्निशमन अधिकारी, अग्निशमन केंद्र अधिकारी, उप-मुख्य लेखा व वित्त अधिकारी व शाखा अभियंता (विद्युत) या पदावर पदोन्नतीकरीता खालीलप्रमाणे अर्हता विहित करण्यात आली आहे.

| पदनाम व श्रेणी | नेमणुकीची पध्दत व टक्केवारी | नेमणुकीकरता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती |
|---|---|---|
| उप मुख्य अग्निशमन अधिकारी | पदोन्नती 100% | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील 'अग्निशमन केंद्र अधिकारी' या पदावर किमान 03 वर्षे सेवा पूर्ण झालेल्या किंवा 'सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी' या पदावर किमान 10 वर्षे सेवा पूर्ण झालेल्या (यापूर्वी लगतच्या 2 वर्षात 'अग्निशमन केंद्र अधिकारी' या पदावर पदोन्नती दिली असल्यास मागील सेवा विचारात घेऊन) व राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर यांच्याकडील पदवी (B.E. Fire).<br>किंवा<br>राष्ट्रीय अग्निशमनसेवा महाविद्यालय, नागपूर यांच्याकडील Divisional Fire Officer पाठयक्रम (अग्निशमन अभियांत्रिकी मधील प्रगत पदविका)<br>किंवा<br>The Istitution of Fire Engineers (U.K) किंवा (India) या संस्थेकडील सदस्यत्व (M.I.Fire)<br>किंवा<br>कोणत्याही शाखेची पदवी प्राप्त केल्यानंतर The Istitution of Fire Engineers (U.K) यांचे सदस्यत्व प्राप्त केलेल्या अधिकाऱ्याची सेवाजेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| अग्निशमन केंद्र अधिकारी | पदोन्नती 100% | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची कोणत्याही शाखेची पदवी.<br>ब) राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय नागपूर, |

| | | |
|---|---|---|
